



# आपल्या स्थानिक शासन संस्था

(नागरिकशास्त्र आणि प्रशासन)

**इयत्ता सहावी**



शिक्षणखात्याचा मंजुरी क्रमांक :
प्राशिसं/२००७-०८/मंजुरी ५०५(१) दि. ९.११.२००६

# आपल्या स्थानिक शासन संस्था

## (नागरिकशास्त्र आणि प्रशासन)

## इयत्ता सहावी

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

प्रथमावृत्ती : २००७
पुनर्मुद्रण : जुलै, २०१०

© महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे-४११ ००४.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे या पुस्तकाचे सर्व हक्क राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्‌धृत करता येणार नाही.

| | |
|---|---|
| संपादक मंडळ : | श्री. श्रीकांत थावरे<br>श्री. सुभाष तोडकर<br>डॉ. बाळ कांबळे<br>प्रा. नंदिनी तडकलकर-चौधरी<br>श्री. मोगल जाधव, समन्वयक |
| लेखक : | प्रा. साधना कुलकर्णी |
| संयोजक : | श्री. मोगल जाधव<br>विशेषाधिकारी, इतिहास व नागरिकशास्त्र,<br>पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे. ४. |
| मुखपृष्ठ व सजावट : | श्री. शरद प्रभुदेसाई |
| निर्मिती : | श्री. राजेंद्र विसपुते, निर्मिती अधिकारी<br>श्री. प्रभाकर परब, निर्मिती सहाय्यक |
| अक्षरजुळणी : | मुद्रा विभाग, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे. ४. |
| कागद : | ७० जी. एस. एम. क्रीमवोव्ह |
| मुद्रणादेश : | N / Tech / 2011-12 Qty : 1,00,000 |
| मुद्रक : | Atharva Print Creation Pune - 41 |
| प्रकाशक : | श्री. विवेक उत्तम गोसावी<br>नियंत्रक,<br>पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, प्रभादेवी, मुंबई-२५. |

# भारताचे संविधान

## प्रास्ताविका

**आम्ही, भारताचे लोक,** भारताचे एक **सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडवण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस :

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**

निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;

**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करत आहोत.**

# प्रतिज्ञा

भारत माझा देश आहे. सारे भारतीय माझे बांधव आहेत.

माझ्या देशावर माझे प्रेम आहे. माझ्या देशातल्या समृद्ध्ध आणि विविधतेने नटलेल्या परंपरांचा मला अभिमान आहे. त्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी म्हणून मी सदैव प्रयत्न करीन.

मी माझ्या पालकांचा, गुरुजनांचा आणि वडीलधाऱ्या माणसांचा मान ठेवीन आणि प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.

माझा देश आणि माझे देशबांधव यांच्याशी निष्ठा राखण्याची मी प्रतिज्ञा करीत आहे. त्यांचे कल्याण आणि त्यांची समृद्ध्धी ह्यांतच माझे सौख्य सामावले आहे.

# प्रस्तावना

'राष्ट्रीय शैक्षणिक आराखडा - २०००' अनुसार महाराष्ट्र राज्यात 'प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम - २००४' तयार करण्यात आला. या अभ्यासक्रमाची कार्यवाही २००६-२००७ या शालेय वर्षापासून क्रमशः सुरू झाली आहे. अभ्यासक्रमात इतिहास व नागरिकशास्त्र हे विषय इयत्ता तिसरीपासून सुरू करण्यात आले आहेत.

अभ्यासक्रमानुसार इयत्ता पाचवीपर्यंत इतिहास व नागरिकशास्त्र या विषयांचा समावेश एकाच पाठ्यपुस्तकात करण्यात आला आहे. इयत्ता सहावी ते आठवी या उच्च प्राथमिक स्तरावर नागरिकशास्त्र आणि प्रशासन या विषयास अभ्यासक्रमात स्वतंत्र दर्जा दिला असून शासनमान्य अभ्यासक्रमानुसार मंडळाने इयत्ता सहावीचे प्रस्तुत पाठ्यपुस्तक तयार केले आहे. हे पाठ्यपुस्तक आपल्या हाती देताना आम्हांला आनंद वाटतो.

अध्ययन-अध्यापन प्रक्रिया बालकेंद्रित असावी, स्वयं-अध्ययनावर भर दिला जावा, प्राथमिक शिक्षणाच्या अखेरीस विद्यार्थ्यांनी 'किमान क्षमता' प्राप्त कराव्या, शिक्षणाची प्रक्रिया आनंददायी व्हावी असा व्यापक दृष्टिकोन समोर ठेवून हे पुस्तक तयार केले आहे. स्थानिक शासन संस्थांची माहिती देताना स्थानिक विकासात आपली भूमिका कोणती असावी, याचे मार्गदर्शन पाठ्यपुस्तकात केले आहे. स्वयं-अध्ययन सुलभ व्हावे म्हणून पुस्तकात प्रत्येक पाठावर स्वाध्याय दिले आहेत. पाठ्यपुस्तकात शेवटी विषयाशी संबंधित पूरक माहिती दिलेली आहे. त्या माहितीवर प्रश्न विचारणे अपेक्षित नाही.

पाठ्यपुस्तक जास्तीत जास्त निर्दोष व दर्जेदार व्हावे या दृष्टीने महाराष्ट्राच्या सर्व भागांतील निवडक शिक्षक, तसेच काही शिक्षणतज्ज्ञ व विषयतज्ज्ञ यांच्याकडून या पुस्तकाचे समीक्षण करण्यात आले. आलेल्या सूचना व अभिप्राय यांचा काळजीपूर्वक विचार करून या पुस्तकाला अंतिम स्वरूप देण्यात आले आहे. संपादक मंडळ, लेखक आणि चित्रकार यांनी अतिशय आस्थेने हे पुस्तक तयार केले आहे. मंडळ या सर्वांचे मनःपूर्वक आभारी आहे.

विद्यार्थी, शिक्षक व पालक या पुस्तकाचे स्वागत करतील, अशी आशा आहे.

(डॉ. वसंत काळपांडे)
संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

पुणे
दिनांक : १८ नोव्हेंबर २००६
१३ कार्तिक शके १९२८

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | आपले सामाजिक जीवन | १ |
| २. | ग्रामपंचायत | ५ |
| ३. | पंचायत समिती | ११ |
| ४. | जिल्हा परिषद | १५ |
| ५. | नगरपरिषद | १९ |
| ६. | महानगरपालिका | २५ |
| ७. | स्थानिक शासन संस्थांचे महत्त्व | २९ |
| ८. | आपला सहभाग | ३३ |
| | परिशिष्ट | ३७ |

# १. आपले सामाजिक जीवन

आपण समूहात राहतो. अनेक समूहांचा मिळून समाज होतो. एखाद्या भूप्रदेशावरील समान जीवन पद्धती असणाऱ्या लोकांच्या समूहाला समाज असे म्हणतात. समाजातील लोकांच्या आचार-विचारांत सारखेपणा असतो. समाजाचे एक निश्चित ध्येय असते. समाजाच्या स्थैर्य आणि विकासासाठी लोकांमध्ये ऐक्याची भावना असणे आवश्यक असते.

**समाजाची आवश्यकता :** समाजात एकत्र राहिल्याने आपल्याला एकमेकांचा आधार मिळतो. अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण व आरोग्य यांच्याशी संबंधित गरजा समाजामुळे पूर्ण होतात. या गरजा भागवण्यासाठी आपण निसर्गातील साधनसंपत्तीचा वापर करतो. नैसर्गिक पर्यावरण व मानवी जीवन यांच्यातील अतूट नात्याची जाणीवही समाजामुळे होते.

प्रत्येक व्यक्तीमध्ये निसर्गतःच काही गुण व क्षमता असतात. व्यक्तीमधील गुणांचा आणि क्षमतांचा विकास समाजामुळे होतो. कुटुंब, शाळा आणि अन्य संस्थांमुळे व्यक्तीला आपला सर्वांगीण विकास साधण्याची संधी मिळते.

लोकशाही, धर्मनिरपेक्षता आणि स्त्री-पुरुष समानता यांसारख्या विचारांची ओळख समाजात होते. या विचारांची जोपासना करण्याचे प्रयत्न एकत्रितपणे व परस्पर सहकार्याने करता येतात.

समाजात सातत्याने बदल होत असतात. विज्ञान व तंत्रज्ञानातील प्रगतीचा आपल्या सामाजिक जीवनावर परिणाम होत असतो. आपल्या आचार-विचारांच्या पद्धतींतही बदल होतो. अशा वेळेस चांगल्या विचारांचे आपण जतन केले पाहिजे. विज्ञाननिष्ठा, मानवी हक्कांची जोपासना, समता, पर्यावरणाचे संरक्षण या स्वरूपाचा नवा विचार


स्वीकारला पाहिजे. समाजाची प्रगती व्हावी, असे प्रत्येकाला मनापासून वाटले पाहिजे. यातून न्याय व समतेवर आधारलेल्या समाजाची आपल्याला निर्मिती करता येईल.

**सामाजिक संस्था :** समाजात विविध स्वरूपाच्या संस्था असतात. समाजाला उपयुक्त ठरतील अशी महत्त्वाची कामे त्या पार पाडतात. अशा काही सामाजिक संस्थांची माहिती आपण घेणार आहोत.

**कुटुंबसंस्था :** कुटुंब ही मानवी जीवनातील पहिली सामाजिक संस्था आहे. आपली जडणघडण कुटुंबात होते. घरातील वातावरणाचा आपल्यावर परिणाम होत असतो. आई-वडील, भाऊ-बहीण, आजी-आजोबा आणि इतर नातेवाईक यांच्या आचार-विचारांचा प्रभाव आपल्यावर पडतो. कुटुंबातील छोट्या-मोठ्या निर्णयांमध्ये प्रत्येकाला सहभागी होता येते. प्रत्येकाला आपले मत मांडण्याची संधी मिळते. कुटुंबात मुलगा व मुलगी असा भेद न करता दोघांनाही शिक्षणाची व विकासाची समान संधी मिळते. अशा कौटुंबिक वातावरणात मोठी झालेली मुले आणि मुली परस्परांचा व इतरांचा आदर करायला शिकतात. कुटुंबात सहकार्य, आदरभावना आणि स्वत:बद्दलचा विश्वास या गुणांची जोपासना होते.

घरातील वातावरण खेळीमेळीचे असावे, यासाठी सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत. वडीलधाऱ्या माणसांबद्दल आदर असावा. कुटुंबात सर्वांचा दर्जा समान असला पाहिजे. यामुळे समतेवर आधारलेल्या समाजाचा पाया कुटुंबात तयार होण्यास मदत होते.

**शाळा :** शाळा आपल्या व्यक्तिमत्त्वाला आकार देते. भविष्यातील एक जबाबदार नागरिक घडवण्याचे प्रयत्न शाळेत होतात. विविध स्पर्धांमुळे आपल्यातील गुणांना वाव मिळतो. वक्तृत्व स्पर्धेत भाग घेतल्याने संभाषण




आपली शाळा

कौशल्य विकसित होते. खेळांच्या स्पर्धेत भाग घेतल्याने सांघिक वृत्तीची ज़ोपासना होते. निरनिराळे छंद जोपासण्याची सवय शाळेत होते. समृद्ध आणि आनंदी व्यक्तिमत्त्वाच्या निर्मितीत शाळेचा मोठा वाटा असतो. छोटी-मोठी आव्हाने स्वीकारणे, साहस दाखवणे, जबाबदारीने एखादा उपक्रम पूर्ण करणे इत्यादी संधी शाळेत मिळतात. सहली, स्नेहसंमेलने, क्षेत्रभेटी, बालवीर-वीरबाला चळवळ, राष्ट्रीय छात्रसेना आणि महाराष्ट्र छात्रसेना इत्यादी उपक्रमांतून या संधी मिळतात. सहकार्य, शिस्त आणि नियमांचा आदर करण्याची वृत्ती या गुणांचा विकास शाळेमुळे होतो.

**गाव-शहर** : आपण गावात किंवा शहरात राहतो. एका मोठ्या समूहाचे आपण एक घटक आहोत, ही जाणीव गावामुळे आपल्याला होते.

आपल्या गावाबद्दल किंवा शहराबद्दल आत्मीयता असायला हवी. गावाच्या विकासाबद्दल प्रत्येकाला तळमळ असली पाहिजे. आपल्या गावाचे भौगोलिक स्थान व ऐतिहासिक महत्त्व यांची माहिती असावी. गावाच्या विकास योजनेत सहभागी झाले पाहिजे. अशा लोकसहभागातून विकास करण्याची वृत्ती जोपासली जाते. गावाचा विकास आपण करू शकतो, ही जाणीव प्रत्येक नागरिकात निर्माण झाली पाहिजे.

## स्वाध्याय

१. **रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) समाजाच्या स्थैर्य आणि विकासासाठी लोकांमध्ये ............ भावना असणे आवश्यक असते.

(आ) व्यक्तीमधील गुणांचा आणि ........... विकास समाजामुळे होतो.

(इ) मानवी जीवनातील ............ ही पहिली सामाजिक संस्था आहे.

(ई) खेळांच्या स्पर्धेत भाग घेतल्याने ......... वृत्तीची जोपासना होते.

२. **प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) कुटुंबात कोणत्या गुणांची जोपासना होते?

(आ) कुटुंबातील कोणाच्या आचार-विचारांचा प्रभाव आपल्यावर पडतो?

(इ) गावामुळे आपल्याला कोणती जाणीव होते?

३. **दोन ते तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) समाजामुळे कोणत्या गरजा पूर्ण होतात?

(आ) शाळेत कोणत्या संधी मिळतात?

**उपक्रम**

तुमच्या शाळेत कोणते उपक्रम चालतात त्यांची यादी करा. त्यांपैकी एका उपक्रमात तुम्ही सक्रिय सहभाग घ्या.

# २. ग्रामपंचायत

आपल्या देशातील बहुसंख्य लोक खेड्यांत राहतात. खेड्यांचा विकास झाल्याशिवाय देशाचा विकास होणार नाही. ग्रामीण आणि शहरी भागांचा विकास त्या त्या ठिकाणी असणाऱ्या संस्थांमुळे होतो. गावाचा कारभार पाहण्यासाठी ग्रामपंचायत, तालुक्याचा कारभार पाहण्यासाठी पंचायत समिती, तर जिल्ह्याचा कारभार पाहण्यासाठी जिल्हा परिषद या संस्था असतात. या संस्थांना ग्रामीण स्थानिक शासन संस्था असे म्हणतात.

ग्रामीण भागांतील कारभार पाहणाऱ्या स्थानिक शासन संस्थांना एकत्रितपणे 'पंचायती राज' असे म्हणतात. ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद हे पंचायती राज व्यवस्थेचे तीन घटक आहेत. ही तीन स्तरीय रचना म्हणजे ग्रामीण भागांच्या विकासासाठी निर्माण केलेली पंचायती राज व्यवस्था होय.

ब्रिटिशांच्या राजवटीपूर्वी भारतातील खेडी स्वयंपूर्ण होती. गावाचा कारभार गावातील लोकच करत असत. महसूल गोळा करण्यापासून ते भांडण-तंटे सोडवण्यापर्यंत अनेक कामे गावातच केली जात असत, परंतु ब्रिटिश राजवटीत ही परिस्थिती बदलली. खेडी स्वयंपूर्ण राहिली नाहीत. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी खेड्यांच्या विकासाकडे दुर्लक्ष केले. आपल्या फायद्यासाठी शहरांचा विकास केला. त्यामुळे खेड्यांपेक्षा शहरांचा विकास जास्त झाला.

आपला देश स्वतंत्र झाल्यानंतर ग्रामीण भागाचा विकास व्हावा, म्हणून अनेक योजना सुरू करण्यात आल्या. विकासाच्या योजनांमध्ये स्थानिक जनतेला सहभागी करून घेतले, तरच खरा विकास साधता येतो. त्यासाठी स्थानिक पातळीवरचा कारभार स्थानिक प्रतिनिधींच्या हाती

सोपवण्यात आला. स्थानिक कारभाराची सत्ता तेथील लोकांच्या हाती देणे, याला 'सत्तेचे विकेंद्रीकरण' असे म्हणतात.

**ग्रामपंचायत** : ग्रामपंचायत हा पंचायती राजचा पायाभूत घटक आहे.

**रचना** : ग्रामपंचायतीत लोकसंख्येच्या प्रमाणात कमीत कमी सात व जास्तीत जास्त सतरा सदस्य असतात. त्यांपैकी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग यांच्यासाठी काही जागा राखीव असतात. महिलांसाठी काही जागा राखीव असतात. राखीव जागांमुळे या सर्व घटकांना गावाच्या कारभारात सहभाग घेण्याची संधी मिळते.

गावाचा कारभार पाहण्यासाठी गावातून काही प्रतिनिधी (पंच) निवडून दिले जातात. पंच निवडण्यासाठी गावाचे काही भाग तयार केले जातात. त्यांना प्रभाग (वॉर्ड) असे म्हणतात. ग्रामपंचायतीच्या सर्व सदस्यांची म्हणजेच पंचांची निवड प्रौढ व गुप्त मतदान पद्धतीने होते.

पाचशेपेक्षा लोकसंख्या कमी आहे, अशा दोन किंवा अधिक गावांसाठी एकच ग्रामपंचायत असते. तिला 'गट ग्रामपंचायत' असे म्हणतात.

**कार्यकाल व पात्रता** : ग्रामपंचायतीच्या निवडणुका दर पाच वर्षांनी होतात. सदस्यांची निवड पाच वर्षांच्या मुदतीसाठी असते. निवडणूक लढवणारा उमेदवार भारताचा नागरिक असावा. त्याचे वय २१ वर्षे पूर्ण असले पाहिजे. त्याचे नाव स्थानिक मतदार यादीत असावे.

**सरपंच** : ग्रामपंचायतीच्या प्रमुखाला सरपंच असे म्हणतात. ग्रामपंचायतीचे निवडून आलेले सदस्य आपल्यातून सरपंचाची आणि उपसरपंचाची निवड करतात. महिलांनाही सरपंच पद भूषवण्याची संधी मिळते. ही निवड पाच वर्षांसाठी केली जाते. सरपंचाच्या मार्गदर्शनाखाली

ग्रामपंचायतीचा कारभार चालतो. गावाच्या विकास योजना प्रत्यक्ष राबवण्याची जबाबदारी सरपंचावर असते. ग्रामपंचायतीच्या सभा सरपंचाच्या अध्यक्षतेखाली होतात. सरपंचाला त्याच्या कामकाजात उपसरपंच मदत करतो. योग्य पद्धतीने कारभार न करणाऱ्या सरपंचावर अविश्वासाचा ठराव सदस्यांना मांडता येतो.

**ग्रामसेवक** : ग्रामपंचायतीचे दैनंदिन कामकाज पाहण्यासाठी शासनाने नेमलेल्या व्यक्तीला ग्रामसेवक असे म्हणतात. तो ग्रामपंचायतीचा सचिव म्हणून काम करतो. गावाच्या विकासासाठी असणाऱ्या विविध योजनांची माहिती तो ग्रामस्थांना देतो. शासन आणि गावकरी यांच्यातील तो एक महत्त्वाचा दुवा असतो. ग्रामपंचायतीचे अंदाजपत्रक तयार करणे, ग्रामपंचायतीचे दप्तर सांभाळणे, गावातील लोकांना आरोग्य, शेती, विकास योजना आणि शिक्षण इत्यादींबाबत माहिती देण्याचे काम ग्रामसेवक करतो.

**ग्रामपंचायतीची कामे** : गावाच्या विकासात ग्रामपंचायतीचे स्थान फार महत्त्वाचे असते. गावातील लोकांना सर्व प्रकारच्या सोई आणि सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम ग्रामपंचायत करते.

१. गावात रस्ते बांधणे व देखभाल करणे.

२. दिवाबत्तीची सोय करणे.

३. गावात स्वच्छता ठेवणे.

४. सांडपाण्याची व्यवस्था करणे.

५. पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे.

६. गावात बाजार, उत्सव, जत्रा यांची व्यवस्था ठेवणे.


७. जन्म-मृत्यू व विवाहाची नोंद ठेवणे.

८. आरोग्यविषयक सोई व सुविधा पुरवणे.

९. शेती व पशुधन विकासाच्या योजना अमलात आणणे.
१०. गावाच्या परिसरात झाडे लावणे व पर्यावरणाचे रक्षण करणे.
११. उद्याने व क्रीडांगणांची सुविधा उपलब्ध करणे.
१२. शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी करणे.

**उत्पन्नाची साधने :** गावाच्या विकासाची कामे पार पाडण्यासाठी ग्रामपंचायतीजवळ पैसा आवश्यक असतो. हा पैसा ग्रामपंचायतीला विविध मार्गांनी प्राप्त होतो. यात्रा कर, घरपट्टी, पाणीपट्टी, आठवडे बाजार यांवरील कर ही ग्रामपंचायतीच्या उत्पन्नाची साधने आहेत. याशिवाय राज्य सरकार आणि जिल्हा परिषद यांच्याकडून ग्रामपंचायतीला अनुदान मिळते. गावाच्या विकासाची कामे पूर्ण होण्यासाठी नागरिकांनी कर वेळेवर भरले पाहिजेत.

**ग्रामसभा :** गावातील सर्व प्रौढ गावकऱ्यांच्या सभेला ग्रामसभा




ग्रामसभा

असे म्हणतात. ग्रामसभेच्या वर्षातून सहा सभा होतात. ग्रामसभा बोलावण्याची जबाबदारी सरपंचावर असते. ग्रामसभेचा अध्यक्ष सरपंच असतो. ग्रामपंचायतीच्या विकासाच्या योजनांना ग्रामसभा मान्यता देते.

ग्रामसभेच्या बैठकीपूर्वी महिला सदस्यांची बैठक होते. या बैठकीत महिलांना आपले प्रश्न मांडण्याची संधी मिळते. पिण्याचे पाणी, दारूबंदी, रोजगार (बचत गट), इंधन, आरोग्य इत्यादी समस्यांबाबत महिला एकत्र येऊन ग्रामसभेत प्रभावीपणे काम करतात.

**ग्रामसभेचे महत्त्व** : गावातले प्रौढ नागरिक ग्रामसभेत एकत्र येतात. ते ग्रामपंचायतीला विकास योजनांबाबत मार्गदर्शन करतात. ग्रामसभेमुळे गावातील लोकांना ग्रामपंचायतीच्या कारभारावर प्रभावी नियंत्रण ठेवता येते. गावातील नागरिक विकासाच्या योजनांविषयी आणि त्यासाठी झालेल्या खर्चाविषयी माहिती मिळवू शकतात. ग्रामसभेमुळे ग्रामीण भागाचा कायापालट घडून येतो. गावाच्या विकासाला दिशा मिळते.

## स्वाध्याय

**१. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) ग्रामीण भागांतील कारभार पाहणाऱ्या स्थानिक शासन संस्थांना एकत्रितपणे .........असे म्हणतात.

(आ) स्थानिक कारभाराची सत्ता तेथील लोकांच्या हाती देणे, याला ......... असे म्हणतात.

(इ) पंचायती राजचा पायाभूत घटक ......... हा आहे.

(ई) ग्रामपंचायतीच्या सभा ......... अध्यक्षतेखाली होतात.

२. 'अ' गट व 'ब' गट यांच्या योग्य जोड्या जुळवा.

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (अ) सरपंच | (१) पंचायती राज |
| (आ) ग्रामसेवक | (२) गावकऱ्यांची सभा |
| (इ) ग्रामसभा | (३) ग्रामपंचायतीचा सचिव |
| | (४) ग्रामपंचायतीचा प्रमुख |

३. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.

(अ) पंचायती राज व्यवस्थेचे तीन घटक कोणते?

(आ) ग्रामपंचायतीच्या सदस्यांची निवड कोणत्या पद्धतीने होते?

४. तीन ते चार वाक्यांत माहिती लिहा.

(अ) सरपंच

(आ) ग्रामसेवक

(इ) ग्रामसभेचे महत्त्व

**उपक्रम**

शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली तुमच्या वर्गाची अभिरूप ग्रामसभा आयोजित करा.

# ३. पंचायत समिती

महाराष्ट्रात प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी 'पंचायत समिती' असते. एका तालुक्यातील सर्व गावांचा एकत्रित असा विकास गट असतो. विकास गटातील सर्व गावांच्या विकासकार्याचा मेळ घालण्याचे काम पंचायत समिती करते. विकास गटाचा कारभार पंचायत समिती पाहते.

**पंचायत समितीची रचना** : विकास गटातील मतदार पंचायत समितीच्या सभासदांची निवड करतात. पंचायत समितीच्या काही जागा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग यांच्यासाठी राखून ठेवलेल्या असतात. महिलांसाठी काही जागा राखीव असतात. या तरतुदीमुळे या घटकांना कारभारात सहभाग घेण्याची संधी मिळते.

**कार्यकाल व पात्रता** : पंचायत समितीच्या निवडणुका दर पाच वर्षांनी होतात. पंचायत समितीच्या सदस्यांचा कार्यकाल पाच वर्षांचा असतो. निवडणूक लढवणारा उमेदवार भारताचा नागरिक असावा. त्याचे वय २१ वर्षे पूर्ण असले पाहिजे. त्याचे नाव स्थानिक मतदार यादीत असावे.

**पंचायत समिती पदाधिकारी** : पंचायत समितीत निवडून आलेले सदस्य आपल्यापैकी एकाची सभापती व एकाची उपसभापती म्हणून निवड करतात. त्यांची मुदत अडीच वर्षांची असते. पंचायत समितीतील सभापतीपद क्रमशः अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग आणि महिलांसाठी राखून ठेवले जाते. पंचायत समितीची बैठक सभापतीच्या अध्यक्षतेखाली चालते. त्याच्या नियंत्रणाखाली पंचायत समितीचा कारभार चालतो. सभापतीच्या अनुपस्थितीत उपसभापती पंचायत समितीचे कामकाज पाहतो.

पंचायत समितीच्या सभापतीला व उपसभापतीला मुदत संपण्यापूर्वी आपल्या पदाचा राजीनामा देता येतो. पंचायत समितीच्या सदस्यांना त्यांच्याविरुद्ध अविश्वासाचा ठराव मांडता येतो. विशेष बहुमताने अविश्वासाचा ठराव मंजूर झाल्यास या पदाधिकाऱ्यांना पदावरून दूर केले जाते.

**पंचायत समितीचे प्रशासन** : पंचायत समितीचा प्रशासकीय प्रमुख 'गटविकास अधिकारी' असतो. त्याची नेमणूक राज्यशासन करते. पंचायत समितीचा सचिव म्हणून तो काम पाहतो. पंचायत समितीच्या कामकाजाचा अहवाल तयार करणे, पंचायत समितीचे अंदाजपत्रक तयार करणे इत्यादी कामे त्याला करावी लागतात.



पंचायत समितीच्या प्रशासनाची विभागणी सात भागांत करण्यात आली आहे. सर्वसाधारण प्रशासन, वित्त, सार्वजनिक बांधकाम, शेती, आरोग्य, शिक्षण आणि समाज कल्याण हे ते सात विभाग आहेत. प्रत्येक विभागासाठी एक अधिकारी असतो. प्रशासनाचे हे सर्व विभाग गटविकास अधिकाऱ्याच्या मार्गदर्शनाखाली काम करतात.

**पंचायत समितीची कामे** : पंचायत समिती हा ग्रामपंचायत व जिल्हा परिषद यांच्यातील दुवा आहे. आपल्या विकास गटातील लोकांच्या गरजा लक्षात घेऊन विकासाची कामे पंचायत समिती करते.

१. शेतीविषयक सुधारणांच्या योजनांची अंमलबजावणी करणे.

२. सार्वजनिक आरोग्याच्या सोई करणे.

३. प्राथमिक शिक्षणाच्या सोई करणे.

४. पाझर तलावांच्या कामांना गती देणे.

५. जलसिंचनाच्या सोई उपलब्ध करून देणे.

६. पशुधनाचा विकास करणे.

७. गावागावांना जोडणाऱ्या रस्त्यांची दुरुस्ती करणे.

८. हस्तोद्योग व कुटीरोद्योगांना प्रोत्साहन देणे.

९. समाज कल्याणाच्या विविध योजना राबवणे.

**उत्पन्नाची साधने** : पंचायत समितीला उत्पन्नाची स्वतंत्र साधने नसतात. जिल्हा परिषद जिल्हा निधीतून काही रक्कम पंचायत समितीला देते. राज्यशासन जमीन महसुलाच्या प्रमाणात काही अनुदान जिल्हा परिषदेमार्फत पंचायत समितीला देते.

## स्वाध्याय

१. **रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) महाराष्ट्रात प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी ............ असते.

(आ) पंचायत समितीच्या निवडणुका दर ............ वर्षांनी होतात.

(इ) पंचायत समितीची बैठक ............ अध्यक्षतेखाली चालते.

(ई) ग्रामपंचायत व जिल्हा परिषद यांच्यातील दुवा ............ हा आहे.

२. **प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) सभापतीला त्याच्या पदावरून कोणत्या पद्धतीने दूर करता येते?

(आ) पंचायत समितीचा प्रशासकीय प्रमुख कोण असतो?

३. **तीन ते चार वाक्यांत माहिती लिहा.**

(अ) गटविकास अधिकाऱ्याची कामे

(आ) पंचायत समितीची चार कामे

**उपक्रम**

पंचायत समितीच्या कामांचा चित्ररूप तक्ता तयार करून वर्गात लावा.

# ४. जिल्हा परिषद

महाराष्ट्रात ग्रामीण विकासाच्या कार्यात जिल्हा परिषदेला महत्त्वाचे स्थान आहे. प्रत्येक जिल्ह्यासाठी जिल्हा परिषद असते. जिल्ह्याच्या ठिंकाणी जिल्हा परिषदेचे कार्यालय असते.

**जिल्हा परिषदेची रचना :** जिल्हा परिषदेची सदस्यसंख्या कमीत कमी पन्नास व जास्तीत जास्त पंचाहत्तर असते. प्रौढ व गुप्त मतदान पद्धतीने सदस्यांची निवड केली जाते. त्यांतील काही जागा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग आणि महिला यांच्यासाठी राखून ठेवलेल्या असतात. जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांचे सभापती जिल्हा परिषदेचे सभासद असतात.

**कार्यकाल व पात्रता :** जिल्हा परिषदेच्या निवडणुका दर पाच वर्षांनी होतात. सदस्यांची निवड पाच वर्षांच्या मुदतीसाठी असते. निवडणूक लढवणारा उमेदवार भारताचा नागरिक असावा. त्याचे वय २१ वर्षे पूर्ण असले पाहिजे. त्याचे नाव स्थानिक मतदार यादीत असावे.

**जिल्हा परिषदेचे पदाधिकारी :** अध्यक्ष व उपाध्यक्ष हे जिल्हा परिषदेचे पदाधिकारी असतात. जिल्हा परिषदेत निवडून आलेले सदस्य आपल्यापैकी एकाची अध्यक्ष व एकाची उपाध्यक्ष म्हणून निवड करतात. त्यांचा कार्यकाल अडीच वर्षांचा असतो. ही मुदत संपण्यापूर्वी ते राजीनामा देऊ शकतात. त्यांनी पदाला न शोभणारे वर्तन केल्यास राज्यशासन त्यांना पदावरुन दूर करु शकते. सदस्यांना त्यांच्याविरुद्ध अविश्वासाचा ठराव मांडता येतो.

ज्या वेळी जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद महिलांसाठी राखीव असते, त्या वेळी अध्यक्षपदी असलेल्या महिलेविरुद्धच्या अविश्वासाच्या ठरावाला एकूण सदस्यांपैकी तीन चतुर्थांश सदस्यांचा पाठिंबा असावा लागतो. या

तरतुदीमुळे महिला अध्यक्षांना पुरेसे कायदेशीर संरक्षण मिळते. त्यामुळे क्षुल्लक कारणावरून महिला अध्यक्षांना पदावरून दूर करण्याच्या प्रवृत्तीला आळा बसतो.

**जिल्हा परिषदेच्या समित्या** : जिल्हा पातळीवरील विकासाच्या योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यासाठी विविध समित्या असतात. जिल्हा परिषदेच्या एकूण दहा समित्या असतात. १. स्थायी समिती २. वित्त समिती ३. बांधकाम समिती ४. कृषी समिती ५. समाज कल्याण समिती ६. शिक्षण समिती ७. आरोग्य समिती ८. पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती ९. महिला व बालकल्याण समिती १०. जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती.

या समित्यांपैकी स्थायी समिती सर्वांत महत्त्वाची असते. स्थायी समिती इतर समित्यांच्या कामकाजात समन्वय आणि सुसूत्रता आणते. त्यांच्या कामकाजावर नियंत्रण ठेवते. जिल्हा परिषदेचा अध्यक्ष हा स्थायी समितीचा पदसिद्ध अध्यक्ष असतो.

**जिल्हा परिषदेचे प्रशासन** : 'मुख्य कार्यकारी अधिकारी' हा जिल्हा परिषदेच्या प्रशासनाचा प्रमुख असतो. या पदावर भारतीय प्रशासकीय सेवेतील व्यक्तीची नेमणूक राज्यशासन करते.

मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याला जिल्हा परिषदेच्या सर्व विभागांवर देखरेख करावी लागते. जिल्हा परिषदेचे सभासद आणि जिल्हा परिषदेचे प्रशासन यांना जोडणारा तो महत्त्वाचा दुवा आहे. जिल्हा परिषदेच्या सर्व कामांना आणि विकास योजनांना गती देण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे काम मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याचे आहे.

**जिल्हा परिषदेची कामे** : जिल्ह्याच्या विकासासाठी विविध

योजना आखून त्यांची अंमलबजावणी करणे, हे जिल्हा परिषदेचे महत्त्वाचे काम आहे.

**शेतीविषयक कामे** : शेतीच्या विकासासाठी शेतकऱ्यांना सुधारित बी-बियाणे पुरवणे, शेती उत्पादन वाढावे व त्याचा फायदा शेतकऱ्यांना मिळावा म्हणून शेती करण्याच्या नव्या पद्धतींची माहिती शेतकऱ्यांना देणे, जलसिंचनाच्या योजना राबवणे इत्यादी कामे जिल्हा परिषद करते.

**शिक्षणविषयक कामे** : संपूर्ण जिल्ह्यात प्राथमिक शिक्षणाच्या सोई उपलब्ध व्हाव्या, म्हणून गावोगावी शाळा सुरू करण्याचे काम जिल्हा परिषद करते. आदिवासी मुलांमुलींसाठी आश्रमशाळा आणि अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी मोफत वसतिगृहे चालवते.

**आरोग्यविषयक कामे** : लोकांचे आरोग्य चांगले राहावे, म्हणून जिल्हा परिषद गावोगावी प्राथमिक आरोग्य केंद्रे स्थापन करते. छोट्या गावांसाठी फिरते दवाखाने स्थापन करते. लसीकरणाची मोहीम राबवणे आणि कुटुंब नियोजनाचा प्रचार व प्रसार करणे इत्यादी कामे जिल्हा परिषदेची आहेत.

तसेच ग्रामीण भागांतील विकासाला चालना देऊन छोटे उद्योगधंदे सुरू करण्यासाठी जिल्हा परिषद उद्योजकांना प्रोत्साहन देते.

**उत्पन्नाची साधने** : जिल्हा परिषदेला आपले काम पार पाडण्यासाठी आर्थिक तरतूद करावी लागते. विविध करांपासून मिळणारे उत्पन्न हे जिल्हा परिषदेच्या उत्पन्नाचे मुख्य साधन आहे. उदाहरणार्थ, पाणीपट्टी, यात्रा कर, बाजार कर इत्यादी. जमीन महसुलाच्या प्रमाणात ठरावीक अनुदान राज्यशासन जिल्हा परिषदेस देते. एखादी विकास योजना पूर्ण करण्यासाठी राज्यशासन जिल्हा परिषदेला निधी उपलब्ध करून देते.

## स्वाध्याय

**१. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) जिल्हा परिषदेची सदस्यसंख्या कमीत कमी ............ व जास्तीत जास्त पंचाहत्तर असते.

(आ) जिल्हा परिषदेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचा कार्यकाल ............ वर्षांचा असतो.

(इ) जिल्हा परिषदेच्या समित्यांपैकी ............ समिती सर्वांत महत्त्वाची असते.

(ई) जिल्हा परिषदेच्या प्रशासनाचा प्रमुख ............ हा असतो.

**२. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) जिल्हा परिषद सदस्यांची निवड कोणत्या प्रकारे केली जाते?

(आ) जिल्हा परिषद गावोगावी शाळा का सुरू करते?

(इ) जिल्हा परिषद उद्योजकांना प्रोत्साहन का देते?

**३. कारणे द्या.**

(अ) जिल्हा परिषद अध्यक्षांवर अविश्वासाचा ठराव मांडता येतो.

(आ) जिल्हा परिषदेत विविध समित्या असतात.

(इ) जिल्हा परिषद प्राथमिक आरोग्य केंद्रे स्थापन करते.

**४. तीन ते चार वाक्यांत माहिती लिहा.**

(अ) जिल्हा परिषदेची रचना

(आ) मुख्य कार्यकारी अधिकारी

**उपक्रम**

तुमच्या परिसरातील प्राथमिक आरोग्य केंद्र किंवा दवाखान्याला भेट द्या व लसीकरणाच्या मोहिमेची माहिती घ्या.

# ५. नगरपरिषद

ग्रामीण भागांत ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद या संस्था विकासाची कामे करतात. त्याचप्रमाणे शहरी भागांतही नागरिकांना विविध सोई आणि सेवा देण्याचे काम स्थानिक पातळीवर असणाऱ्या नागरी स्थानिक शासन संस्था करतात. नगरपरिषद, महानगरपालिका, नगरपंचायत आणि कटक मंडळ या त्या संस्था होत.

आपल्या देशातील बहुसंख्य जनता ग्रामीण भागांत राहते. ग्रामीण भागांच्या समस्यांपेक्षा शहरी भागांच्या समस्या वेगळ्या असतात. शहरे आकाराने मोठी असतात व त्यांची लोकसंख्याही जास्त असते. शहरांत उद्योग व व्यवसाय यांच्या संधी जास्त प्रमाणात असतात. विकासाच्या सोई ग्रामीण भागांपेक्षा शहरांत अधिक असतात. ग्रामीण भागांतील लोक रोजगाराच्या शोधात शहरांकडे येतात. लोकसंख्या वाढल्यामुळे पाणीपुरवठा, वाहतूक, सांडपाणी आणि वीजपुरवठा या सुविधांवर ताण पडतो. हवा, ध्वनी आणि पाणी यांचे प्रदूषण होते. जागेच्या कमतरतेमुळे गलिच्छ वस्त्यांची निर्मिती होते. नागरिकांना उत्तम सेवा-सुविधा पुरवणे आणि शहरांचा विकास साधणे यांसाठी शहरी भागांत असणाऱ्या स्थानिक शासन संस्थांचे स्वरूप आपण समजावून घेऊ.

**नगरपरिषद** : लहान शहरासाठी नगरपरिषदेची तरतूद करण्यात आलेली आहे. २५,००० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या शहराचा कारभार नगरपरिषद पाहते. नगरपरिषद असलेल्या ठिकाणी शेतीव्यतिरिक्त अन्य व्यवसाय करणाऱ्या लोकांची संख्या मोठी असते.

**नगरपरिषदेचे वर्गीकरण** : महाराष्ट्रात सर्व नगरपरिषदांचे 'अ', 'ब' आणि 'क' असे वर्गीकरण केले आहे. हे वर्गीकरण लोकसंख्येच्या आधारे केले जाते.

**नगरपरिषदेची रचना** : नगरपरिषदेतील सदस्य प्रौढ व गुप्त मतदान पद्धतीने निवडले जातात. नगरपरिषदेच्या सभासदाला 'नगरसेवक' म्हणतात. नगरपरिषदेची किमान व कमाल सदस्यसंख्या नगरपरिषदेच्या दर्जानुसार ठरवली जाते. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग आणि महिला यांच्यासाठी काही जागा राखीव ठेवल्या जातात. राखीव जागांमुळे या सर्व घटकांना स्थानिक कारभारात सहभाग घेण्याची संधी मिळते.

**कार्यकाल व पात्रता** : नगरपरिषदेच्या निवडणुका दर पाच वर्षांनी होतात. सदस्यांची निवड पाच वर्षांच्या मुदतीसाठी असते. निवडणूक लढवणारा उमेदवार भारताचा नागरिक असावा. त्याचे वय २१ वर्षे पूर्ण असले पाहिजे. त्याचे नाव स्थानिक मतदार यादीत असावे.

**नगरपरिषदेचे पदाधिकारी** : नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष हे नगरपरिषदेचे पदाधिकारी असतात. नगरपरिषदेचे सदस्य नगराध्यक्षाची व उपनगराध्यक्षाची निवड करतात. ते अडीच वर्षे काम करतात. नगरपरिषदेचा प्रमुख या नात्याने नगराध्यक्ष नगरपरिषदेच्या सभांचे अध्यक्षपद भूषवतो. शहराच्या विकासाच्या योजनांबाबत निर्णय घेतो. त्यांची अंमलबजावणी होते आहे की नाही, हे पाहण्याची जबाबदारी नगराध्यक्षाची असते. नगराध्यक्षाच्या अनुपस्थितीत उपनगराध्यक्ष त्याचे काम पाहतो. नगराध्यक्षपद क्रमाने अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग आणि महिलांसाठी राखीव असते. अशी आरक्षणे विहित पद्धतीनुसार आळीपाळीने करण्यात येतात.

**नगरपरिषदेच्या समित्या** : नगरपरिषदेचे कामकाज समित्यांमार्फत केले जाते. एक स्थायी समिती व सहा विषय समित्या असतात. सार्वजनिक बांधकाम, शिक्षण, सार्वजनिक स्वच्छता, वैद्यकीय आणि सार्वजनिक आरोग्य,

पाणीपुरवठा नियोजन व विकास, महिला आणि बालकल्याण या विषयांशी संबंधित समित्या नेमल्या जातात.

**नगरपरिषदेचे प्रशासन** : नगरपरिषद प्रशासन यंत्रणेचा प्रमुख 'मुख्याधिकारी' असतो. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व्यक्तीची या पदावर राज्यशासन नेमणूक करते. तो नगरपरिषदेच्या सर्व प्रशासकीय व्यवहारांवर देखरेख ठेवतो. नगरपरिषदेच्या निर्णयांची अंमलबजावणी करतो. अंदाजपत्रक तयार करतो. नगरपरिषदेच्या प्रशासकीय कामकाजात त्याला मदत करण्यासाठी काही अधिकारी नेमलेले असतात. उदाहरणार्थ, आरोग्याधिकारी, शिक्षणाधिकारी, नगरपरिषद अभियंता, अग्निशमन अधिकारी इत्यादी.

**प्रभाग समिती** : तीन लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या नगरपरिषद क्षेत्रासाठी प्रभाग समित्या स्थापन केल्या जातात. प्रत्येक प्रभाग समितीत त्या प्रभागातून निवडून आलेले नगरपरिषद सदस्य, प्रभागाशी संबंधित अधिकारी आणि समाजातील मान्यताप्राप्त कल्याणकारी संस्थांच्या काही कार्यकर्त्यांचा समावेश असतो. ही समिती नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करते. प्रभागाच्या विकासाच्या योजनांना मान्यता देते.

**नगरपरिषदेची कामे** : नगरपरिषदेला दोन प्रकारची कामे पार पाडावी लागतात.

**आवश्यक कामे**

१. रस्त्यावर दिवाबत्तीची सोय करणे.

२. सामाजिक आणि आर्थिक विकासाचे नियोजन करणे.

३. नागरी वनीकरण, पर्यावरणाचे संरक्षण करणे.

४. जन्म-मृत्यूची नोंद करणे.

५. धोकादायक इमारतींबाबत सूचना देणे व कारवाई करणे.

६. प्राथमिक शिक्षणाची सोय करणे.
७. सार्वजनिक दवाखान्याची सोय करणे.
८. स्मशानभूमीची व्यवस्था करणे.
९. पिण्याच्या पाण्याची सोय करणे व सांडपाण्याची व्यवस्था करणे.
१०. अग्निशामक सेवा पुरवणे.

**ऐच्छिक कामे**

१. गलिच्छ वस्ती सुधारणा करणे.
२. नागरी क्षेत्रातील दारिद्र्य दूर करण्यासाठी उपाययोजना करणे.
३. माध्यमिक शिक्षणासाठी सोई उपलब्ध करून देणे.
४. ग्रंथालय, वस्तुसंग्रहालय, व्यायामशाळा इत्यादी सुविधा उपलब्ध करून देणे.
५. निराधार, शारीरिक व मानसिक अपंगत्व असणाऱ्या लोकांसाठी निवाऱ्याची सोय करून देणे.
६. सार्वजनिक बागा आणि उद्याने बांधणे, त्यांची निगा राखणे व रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावणे.

**नगरपरिषदेची उत्पन्नाची साधने** : नगरपरिषदेला विविध प्रकारच्या करांतून उत्पन्न मिळते. उदा., घरपट्टी, पाणीपट्टी, मनोरंजन कर इत्यादी. राज्यशासन नगरपरिषदेला अनुदान देते. नगरपरिषद कर्जाची उभारणी करू शकते.

**कटक मंडळ (कॅन्टोन्मेंट बोर्ड)** : कटक मंडळ हा शहरी स्थानिक शासन संस्थेचा एक वेगळा प्रकार आहे. लष्करी छावणी असणाऱ्या ठिकाणी लष्करी सेवेतील लोकांबरोबर सर्वसाधारण नागरिकांचीही वस्ती असते. अशा ठिकाणी कटक मंडळ ही स्थानिक शासन संस्था लोकांना आवश्यक सेवा व सुविधा पुरवण्याचे काम करते.

**रचना** : कटक मंडळातील काही सदस्य नेमलेले असतात, तर काहींची तेथील मतदार निवड करतात. नियुक्त सदस्यांची संख्या व लोकप्रतिनिधींची सदस्य संख्या सारखीच असते. लष्करी छावणीचा प्रमुख लष्करी अधिकारी व अन्य लष्करी अधिकाऱ्यांचा समावेश कटक मंडळात असतो. कटक मंडळावर संघशासनाच्या संरक्षण मंत्रालयाचे नियंत्रण असते.

**कटक मंडळाची कामे**

१. रस्ते व दिवाबत्तीची सोय करणे.

२. शुद्ध व स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे.

३. प्राथमिक शाळा स्थापन करणे व त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे.

४. जन्म-मृत्यूची नोंद ठेवणे.

५. वीजपुरवठा करणे.

६. वाहतुकीची व्यवस्था करणे.

**नगरपंचायत** : एखादा प्रदेश पूर्णतः ग्रामीण नसतो किंवा पूर्णतः शहरी नसतो. अशा प्रदेशाचे शहरात रूपांतर होत असताना त्या क्षेत्राचा कारभार नगरपंचायत पाहते. दहा हजार ते पंचवीस हजारांपर्यंत लोकसंख्या असणाऱ्या ठिकाणी नगरपंचायत निर्माण करण्यात येते.

## स्वाध्याय

१. **रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) लहान शहरासाठी ............ तरतूद करण्यात आलेली आहे.

(आ) नगरपरिषदेचे वर्गीकरण ............ आधारे केले जाते.

(इ) नगरपरिषदेच्या सभांचे अध्यक्षपद ............भूषवतो.

(ई) नगरपरिषद प्रशासन यंत्रणेचा प्रमुख ............ असतो.

२. **प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) नागरी स्थानिक शासन संस्था कोणत्या आहेत?

(आ) लोकसंख्या वाढल्यामुळे कोणत्या सुविधांवर ताण पडतो?

(इ) नगरपरिषदेची सदस्यसंख्या कोणत्या बाबीवर ठरवली जाते?

३. **दोन ते तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) नगरपरिषदेची कोणतीही दोन ऐच्छिक कामे लिहा.

(आ) नगरपंचायत कोणत्या प्रदेशाचा कारभार पाहते?

४. **तीन ते चार वाक्यांत माहिती लिहा.**

(अ) नगरपरिषदेची आवश्यक कामे

(आ) प्रभाग समिती

(इ) कटक मंडळाची रचना

**उपक्रम**

(अ) तुमच्या प्रभागात स्वच्छता मोहिमेची प्रचारसभा आयोजित करा.

(आ) नगरपरिषदेची आवश्यक कामे आणि ऐच्छिक कामे यांचा तक्ता शिक्षकांच्या मदतीने तयार करून वर्गात लावा.

# ६. महानगरपालिका

मोठ्या शहरांचे स्वरूप आणि समस्या वेगळ्या असतात. उद्योग, व्यापार, शिक्षणसंस्था, संशोधन संस्था, शासकीय कार्यालये अशा अनेक संस्था शहरांत असतात. देशाच्या विविध भागांतून विविध भाषा बोलणारे लोक शहरांत आलेले असतात. त्यामुळे शहरांतील समाजाचे स्वरूप बहुभाषी होते. अलीकडच्या काळात लोकांना विविध सेवा पुरवणारी क्षेत्रे शहरांत मोठ्या प्रमाणात निर्माण झाली आहेत. त्यामुळे शहरांचा विस्तार आणि लोकसंख्या वाढत आहे. अशा महानगरांचा कारभार पाहण्यासाठी महानगरपालिका स्थापन करण्यात आल्या आहेत.

भारतात प्रथम मुंबई येथे महानगरपालिका स्थापन करण्यात आली. सर्वसाधारणपणे ज्या शहराची लोकसंख्या तीन लाखांपेक्षा जास्त आहे, त्या शहरात महानगरपालिका स्थापन करण्यात येते.

**महानगरपालिकेची रचना :** लोकसंख्येच्या प्रमाणात महानगरपालिकेची एकूण सदस्यसंख्या ठरवली जाते. शहराची विभागणी वेगवेगळ्या प्रभागांमध्ये केली जाते. प्रौढ व गुप्त मतदान पद्धतीने सदस्य निवडले जातात. महानगरपालिकेच्या सदस्याला 'नगरसेवक' म्हणतात. महानगरपालिकेतील काही जागा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग आणि महिला यांच्यासाठी राखीव असतात. राखीव जागांमुळे या सर्व घटकांना स्थानिक कारभारात सहभाग घेण्याची संधी मिळते.

**कार्यकाल व पात्रता :** महानगरपालिकेच्या निवडणुका दर पाच वर्षांनी होतात. महानगरपालिकेच्या सदस्यांचा कार्यकाल पाच वर्षांचा असतो. निवडणूक लढवणारा उमेदवार भारताचा नागरिक असावा. त्याचे वय २१ वर्षे पूर्ण असले पाहिजे. त्याचे नाव स्थानिक मतदार यादीत असावे.

**महापौर** : महानगरपालिकेत निवडून आलेले सदस्य आपल्यापैकी एकाची महापौर म्हणून निवड करतात. त्याच वेळी उपमहापौराचीही निवड केली जाते. हे दोन्ही पदाधिकारी अडीच वर्षांसाठी निवडले जातात.

महापौर हा शहराचा पहिला नागरिक मानला जातो. महानगरपालिकेच्या सभांचा तो अध्यक्ष असतो. शहराच्या सर्वांगीण विकासात महापौरांना महत्त्वाची भूमिका बजावता येते. महापौराच्या अनुपस्थितीत उपमहापौर अध्यक्ष म्हणून सभागृहाचे कामकाज पाहतो.

**महानगरपालिकेच्या समित्या** : समित्यांमार्फत स्थानिक कारभार हे भारतातील स्थानिक शासन संस्थांचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. समित्यांमुळे कोणताही निर्णय पूर्ण विचार केल्यानंतरच घेणे शक्य होते.

महानगरपालिकेत एक स्थायी समिती असते. शहराशी संबंधित धोरण ठरवण्याचा व त्यानुसार काही महत्त्वाचे निर्णय घेण्याचा अधिकार स्थायी समितीला असतो. या व्यतिरिक्त महानगरपालिकेत आरोग्य, शिक्षण, परिवहन, पाणीपुरवठा इत्यादी बाबींशी संबंधित समित्या असतात. याशिवाय महानगरपालिका प्रभाग समित्यांचीही निर्मिती करते.

**महानगरपालिकेचे प्रशासन** : 'महानगरपालिका आयुक्त' हा महानगरपालिकेच्या प्रशासनाचा प्रमुख असतो. भारतीय प्रशासकीय सेवेतील व्यक्तीची या पदावर राज्यशासन नेमणूक करते. महानगरपालिकेने घेतलेल्या सर्व निर्णयांची अंमलबजावणी करणे हे त्याचे महत्त्वाचे काम होय. महानगरपालिकेचे वार्षिक अंदाजपत्रक तो तयार करतो. महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेच्या बैठकींना तो उपस्थित राहतो.

**महानगरपालिकेची कामे** : महानगरपालिकेला दोन प्रकारची कामे पार पाडावी लागतात.

**आवश्यक कामे**

१. पिण्याच्या पाण्याचा नियमित पुरवठा करणे.

२. रस्त्यांची देखभाल व दिवाबत्तीची सोय करणे.
३. जन्म-मृत्यूची नोंद ठेवणे.
४. आरोग्यविषयक सेवा उपलब्ध करणे.
५. सांडपाणी वाहून नेण्याची व्यवस्था करणे.
६. झोपडपट्ट्यांची सुधारणा करणे.
७. अग्निशामक सेवा पुरवणे.
८. प्राथमिक शिक्षणाची सोय करणे.
९. धोकादायक इमारतींबाबत सूचना देणे व कारवाई करणे.

**ऐच्छिक कामे**

१. सार्वजनिक उद्याने व क्रीडांगणांची सोय करणे.
२. संगीत व ललित कलांना उत्तेजन देणे.
३. रस्ते व चौकांचे सुशोभीकरण करणे.
४. शहरातील व राज्यातील विशेष कामगिरी केलेल्या व्यक्तींचा सन्मान करणे, मानपत्र देणे.
५. प्रदूषणामुळे पर्यावरणाची हानी होऊ नये याची काळजी घेणे.
६. झाडे लावणे, त्यांचे संगोपन करणे.
७. आरोग्यास घातक ठरणाऱ्या उद्योग, व्यवसायांना व सेवांना परवानगी नाकारणे.
८. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाची सोय करणे.
९. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था करणे.

**उत्पन्नाची साधने :** महानगरपालिका महानगरांचा कारभार पाहत असल्याने तिला मोठ्या प्रमाणावर आर्थिक पाठबळ असावे लागते. महानगरपालिका ही विविध कर वसूल करते. उदा., पाणीपट्टी, घरपट्टी, मनोरंजन कर इत्यादी. 'जकात कर' हे महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे महत्त्वाचे साधन आहे. विविध विकास योजनांसाठी राज्य सरकार महानगरपालिकेला

पैसा उपलब्ध करून देते. राज्यशासनाकडून मिळणारे अनुदान व कर्जउभारणी हे महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे मार्ग आहेत.

## स्वाध्याय

**१. रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा.**

(अ) महानगरांचा कारभार पाहण्यासाठी ............स्थापन करण्यात आल्या आहेत.

(कटक मंडळ, नगरपरिषद, महानगरपालिका, नगरपंचायत)

(आ) भारतात प्रथम ............ येथे महानगरपालिका स्थापन करण्यात आली.

(पुणे, मुंबई, नागपूर, दिल्ली)

(इ) महानगरपालिकेत महत्त्वाचे निर्णय घेण्याचा अधिकार ............ समितीला असतो.

(स्थायी, परिवहन, पाणीपुरवठा, आरोग्य)

**२. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) शहरातील समाजाचे स्वरूप बहुभाषी का होते?

(आ) महानगरपालिका कोणत्या शहरात स्थापन करण्यात येते?

(इ) महानगरपालिकेचे सदस्य कोणत्या पद्धतीने निवडले जातात?

**३. दोन ते तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) महानगरपालिका आयुक्तांची कामे कोणती आहेत?

(आ) महानगरपालिकेत कोणत्या समित्या असतात?

**४. तीन ते चार वाक्यांत माहिती लिहा.**

(अ) महानगरपालिकेची रचना (आ) महानगरपालिकेची आवश्यक कामे

**उपक्रम**

तुमच्या प्रभागातील नगरसेवकाची मुलाखत घेऊन तेथील विकास कामांची यादी तयार करा.

# ७. स्थानिक शासन संस्थांचे महत्त्व

स्थानिक शासन संस्था या सर्वांत प्राथमिक स्तरावरच्या लोकशाही शासन संस्था आहेत. या संस्थांचा लोकांशी जवळचा संबंध येतो. आपल्या परिसराचा विकास करणे आणि लोकांना आवश्यक सेवा पुरवणे हे त्यांचे महत्त्वाचे काम असते. आपले दैनंदिन व्यवहार सांभाळून लोकांना स्थानिक शासन संस्थांच्या कारभारात सहभाग घेणे सहज शक्य असते. एक जबाबदार व क्रियाशील नागरिक घडवण्याचे प्रशिक्षण या संस्था देतात. नेतृत्वगुणांच्या विकासाची संधी स्थानिक शासन संस्थांमुळे मिळते.

**नागरी गुणांची जोपासना :** परस्पर सहकार्य, शिस्त आणि सहिष्णुता यांची जोपासना करण्यास स्थानिक शासन संस्था साहाय्यभूत ठरतात.



नागरी शिस्तपालन

ग्रामसभेच्या निमित्ताने गावाच्या विकासाचे काम करण्यासाठी लोक एकत्र येतात. परस्परांना सहकार्य करून नवे मार्ग शोधतात. सहकार्यातून आपण आपला विकास साधू शकतो, असा विश्वास लोकांमध्ये निर्माण होतो.

नागरिकांमध्ये शिस्त असेल तर नागरी जीवन अधिक संघटित होते. शिस्तीचे पालन केल्याने वेळ आणि पैसा यांची बचत करता येते. सार्वजनिक जीवनात बेशिस्त असेल, तर आपल्याला कायदा व सुव्यवस्था राखणे कठीण होते. त्यावर अनावश्यक पैसा खर्च होतो, म्हणून नागरिकांत शिस्त असणे आवश्यक आहे.

आपले सामूहिक जीवन आनंददायी होण्यासाठी सहिष्णुता आवश्यक आहे. सहिष्णुता म्हणजे सर्व प्रकारच्या मतांबद्दल आदर असणे व चांगल्या मतांचा स्वीकार करण्याची तयारी असणे. स्थानिक प्रश्न सोडवण्याविषयी विविध मते व्यक्त होऊ शकतात. अशा मतांचा आदर करण्याची वृत्ती स्थानिक शासन संस्थांमुळे विकसित होते.

**निर्णय प्रक्रियेची माहिती** : स्थानिक शासन संस्थांमुळे आपल्याला राज्यकारभाराच्या पद्धतीची ओळख होते. स्थानिक पातळीवर लोकप्रतिनिधी लोकांच्या समस्यांवर साधकबाधक चर्चा करतात. त्याची माहिती वृत्तपत्रे व अन्य माध्यमांमार्फत लोकांपर्यंत पोहचते. आपले प्रतिनिधी कसे निर्णय घेतात हे लोकांना समजते. या निर्णय प्रक्रियेत लोकांना सहभाग घेता येतो. अशाच पद्धतीने राज्याच्या आणि देशाच्या पातळीवर निर्णय घेतले जातात, याची जाणीव नागरिकांना होते.

**लोकशाही शिक्षण** : लोकशाहीचे शिक्षण देणाऱ्या संस्था म्हणून स्थानिक शासन संस्थांचे महत्त्व विशेष आहे. स्थानिक पातळीवर प्रतिनिधी निवडताना मतदारांना उमेदवाराच्या कार्याचे मूल्यमापन सहजपणे करता येते. जबाबदारीने मतदानाचा अधिकार बजावून योग्य व्यक्तीची निवड करण्याचे शिक्षण स्थानिक शासन संस्थांच्या निवडणुकीमुळे मिळते.

गावाच्या आणि शहराच्या समस्यांची जाणीव नागरिकांना असल्याने ते लोकप्रतिनिधींच्या कारभारावर नियंत्रण ठेवू शकतात. आपल्या वतीने कारभार करण्याची संधी आपण त्यांना दिलेली आहे आणि त्यांनी कार्यक्षम कारभार करणे हे त्यांचे कर्तव्य आहे, हा विचार नागरिकांमध्ये रुजतो.

लोकशाहीत जबाबदारी व पारदर्शक राज्यकारभार या दोन गोष्टींना महत्त्व असते. त्या प्रत्यक्षात आणण्याचे शिक्षण लोकांना स्थानिक शासन संस्थांमुळे मिळते, म्हणूनच स्थानिक शासन संस्थेला लोकशाहीचे शिक्षण देणारी पाठशाळा म्हणतात.

**सत्तेचे विकेंद्रीकरण** : सार्वजनिक स्वच्छता राखण्यापासून ते आधुनिक तांत्रिक शिक्षणाच्या सोई निर्माण करून देण्यापर्यंतची विविध कामे स्थानिक शासन संस्था करतात. ही कामे दूरवर असणाऱ्या राज्यशासन किंवा संघशासनाकडून कार्यक्षमतेने पार पाडली जातीलच असे नाही. स्थानिक शासन संस्था अधिक प्रभावीपणे आणि कमी वेळात या सुविधा पुरवू शकतात. त्यामुळे राज्यशासन व संघशासनावरील कामाचा भार हलका होतो.

**धोरणाचे यशापयश** : काही महत्त्वाची धोरणे लहान प्रमाणावर राबवून त्यांचे यशापयश अजमावण्याची संधी स्थानिक शासन संस्थांमुळे मिळते. लहान पातळीवर धोरणाला यश आल्यास ते आणखी व्यापक पातळीवर राबवता येते. उदा., साक्षरतेचे धोरण प्रथम काही जिल्ह्यांमध्ये राबवून त्याचे यश विचारात घेऊन, राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये ते राबवता येते.

**स्थानिक वेगळेपणा** : भारतात भाषिक आणि धार्मिक विविधता आहे, तशीच ती नैसर्गिक साधनसामग्रीतही आहे. कुठे जंगलसंपत्ती अधिक असते, तर कुठे जमीन सुपीक असते. हे स्थानिक वेगळेपण जपणे आवश्यक असते, कारण ते तेथील लोकांचे रोजगार किंवा उपजीविकेचे साधन असते. जागतिकीकरणाच्या काळात स्थानिक पातळीवरील वेगळेपण जोपासण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतात.

स्थानिक शासनसंस्था आपत्तीच्या काळात आपत्ती निवारणाचे व नागरिकांना मदत देण्याचे महत्त्वाचे काम पार पाडतात.

## स्वाध्याय

**१. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) स्थानिक शासन संस्था या प्राथमिक स्तरावरच्या ............ शासन संस्था आहेत.

(आ) आपले सामूहिक जीवन आनंददायी होण्यासाठी ............ आवश्यक आहे.

(इ) लोकशाहीत जबाबदारी व ............ राज्यकारभार या दोन गोष्टींना महत्त्व असते.

**२. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) स्थानिक शासन संस्थांमुळे कोणत्या नागरी गुणांची जोपासना होते?

(आ) स्थानिक शासन संस्थांच्या निवडणुकीमुळे कोणते शिक्षण मिळते?

(इ) लोकप्रतिनिधींच्या कारभारावर नागरिक कोणत्या प्रकारे नियंत्रण ठेवू शकतात?

**३. दोन ते तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) नागरिकांत शिस्त असणे का आवश्यक आहे?

(आ) स्थानिक शासन संस्थेला लोकशाहीचे शिक्षण देणारी पाठशाळा का म्हणतात?

**उपक्रम**

'स्थानिक शासन संस्थांचे महत्त्व' या विषयावर शिक्षकांच्या मदतीने वर्गात चर्चासत्र किंवा निबंध स्पर्धा आयोजित करा.

# ८. आपला सहभाग

सामाजिक विकासाच्या प्रयत्नांमध्ये लोकांनी स्वेच्छेने सामील होणे, आपल्या कामाचा वाटा उचलणे, आपल्या जबाबदाऱ्या पार पाडणे म्हणजेच लोकांचा सहभाग असणे होय. लोकांचा सहभाग असणाऱ्या विकास योजना अधिक यशस्वी ठरतात असा अनुभव आहे. लोकांच्या सहभागातून कायमस्वरूपी विकास घडवून आणणे शक्य असते. स्थानिक शासन संस्था लोकांना अशा कामासाठी प्रेरित करतात.

स्थानिक शासन संस्था विविध सेवा, सुविधा आपल्याला उपलब्ध करून देतात, म्हणून आपण समृद्ध सामाजिक जीवन जगू शकतो. अशा सुविधांचा आपण काळजीपूर्वक वापर केला पाहिजे. स्थानिक शासन संस्था जी अनेक कामे पार पाडते, त्यांत आपला सक्रिय सहभाग असला पाहिजे.

**सहभागाची माध्यमे** : स्थानिक कारभारात लोकांना सहभागाचे अनेक मार्ग उपलब्ध असतात. ते पुढीलप्रमाणे आहेत.

**स्थानिक प्रश्नांची ओळख** : आपण ज्या गावात किंवा शहरात राहतो, तेथील समस्यांची आपल्याला जाणीव असली पाहिजे. उदा., गावात स्वच्छतागृह आणि पाणीपुरवठ्याच्या सोई नाहीत किंवा विद्यार्थिनींसाठी वसतिगृह नाही याची जाणीव होणे म्हणजे स्थानिक प्रश्न ओळखणे होय. शहरातील प्रदूषण, वाहतूक व शिक्षण व्यवस्था यांसंबंधीच्या समस्या ओळखणे व त्यांतील सर्वांत महत्त्वाच्या समस्या कोणत्या आहेत याचा विचार करणे, ही सहभागाची सुरुवात म्हणता येईल.

**स्थानिक प्रश्न सोडवण्यात पुढाकार** : स्थानिक समस्यांची फक्त ओळख होणे किंवा त्यांची जाणीव होणे पुरेसे नसते. ते प्रश्न सोडवण्यासाठी लोकांनी उपाय सुचवणेही महत्त्वाचे असते. स्थानिक प्रश्नांच्या सोडवणुकीत पुढाकार घेणे, हा सुद्धा सहभागाचा महत्त्वाचा मार्ग आहे. पाणीटंचाई,

वीजटंचाई, प्रदूषण, वाहतुकीची समस्या इत्यादी प्रश्नांबाबत कोणत्या उपाययोजना कराव्या, याच्या सूचना लोकांनी कराव्या अशी अपेक्षा असते.

**जागरूकता** : स्थानिक शासन संस्थांच्या कारभारावर नागरिकांनी देखरेख ठेवावी. आपल्या प्रतिनिधींचा मतदारसंघातील नागरिकांशी कितपत संपर्क आहे हे पाहणे आवश्यक आहे. प्रतिनिधींच्या चांगल्या कामाची प्रशंसा केली पाहिजे. त्यासाठी आवश्यक ते सहकार्यही दिले पाहिजे. त्याचबरोबर प्रतिनिधींचे मतदारसंघाकडे दुर्लक्ष होत असेल, तर ही बाब त्यांच्या निदर्शनास आणून देणे आवश्यक आहे.




मतदान - आपले कर्तव्य

मतदानाचा हक्क सर्व मतदारांनी बजावला पाहिजे व योग्य उमेदवाराची निवड केली पाहिजे.

**नागरिकांची सनद :** आधुनिक काळात स्थानिक कारभार लोकांच्या गरजांची पूर्तता करणारा असला पाहिजे. लोकांचे कल्याण आणि त्यांच्या हिताची जोपासना हे स्थानिक कारभाराचे उद्‌दिष्ट असते. ते साध्य व्हावे म्हणून नागरिकांना काही हक्क असतात. त्या हक्कांबाबत आग्रह धरणे हे सुद्‌धा सहभागाचे उदाहरण आहे. प्रशासनाच्या संदर्भात असणारे नागरिकांचे अधिकार नागरिकांच्या सनदेत स्पष्ट केलेले असतात.

**माहितीचा अधिकार :** शासनाचा कारभार खुला आणि पारदर्शी असला, तर नागरिक उत्साहाने कारभारात भाग घेतात. स्थानिक शासन संस्था आणि लोक यांच्यातील सहकार्य आणि विश्वास वाढतो. याबरोबरच स्थानिक कारभारावर लोकांचेही नियंत्रण राहते. हे सर्व साध्य व्हावे आणि जनतेचा सहभाग वाढावा, म्हणून माहितीचा अधिकार देण्यात आला आहे. या अधिकाराचा योग्य वापर करून नागरिक आपला सहभाग अधिक परिणामकारक करू शकतात.

**प्रसार माध्यमांचा वापर :** लोकांना माहिती देण्यात आणि लोकमत घडवण्यात वृत्तपत्रे, आकाशवाणी आणि दूरदर्शन या प्रसार माध्यमांचे फार महत्त्व आहे. स्थानिक शासन संस्थांच्या कारभाराचे मूल्यमापन प्रसार माध्यमांच्या आधारे करता येते. प्रसार माध्यमांमुळे लोकांचे राजकीय शिक्षण होते.

**स्वयंसेवी संघटना :** नागरिकांनी विशिष्ट हेतू साध्य करण्यासाठी स्वेच्छेने आणि उत्साहाने एकत्र येऊन निर्माण केलेल्या संस्थांना स्वयंसेवी संघटना असे म्हणतात. आधुनिक काळात विकासाची सर्व कामे सरकारनेच केली पाहिजेत असे मानले जात नाही. किंबहुना नागरिकांच्या प्रयत्नांना सरकारने प्रोत्साहन द्यावे, त्यांना मदत करावी, पाठिंबा द्यावा असा विचार मांडला जातो. स्वयंसेवी संघटनांद्‌वारे काम केल्याने लोकांमध्ये सहकार्याची वृत्ती वाढीस लागते. स्वावलंबनाची भावना निर्माण होते. पर्यायाने शासनावर अवलंबून राहण्याची वृत्ती कमी होते.

महिलांचे अल्पबचत गट, नागरी विकास मंच, विकास सेवा सोसायटी ही काही नागरिकांनी स्वत:च्या इच्छेने स्थापन केलेल्या संघटनांची उदाहरणे आहेत. महिला अल्पबचत गटांमुळे महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्यास मदत होते.

जागरूक नागरिक आणि कार्यक्षम स्थानिक शासन संस्था आपल्या परिसराचा कायापालट करू शकतात.

## स्वाध्याय

**१. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) लोकांचा सहभाग असणाऱ्या ............अधिक यशस्वी ठरतात.

(आ) नागरिकांच्या सनदेत नागरिकांचे ............स्पष्ट केलेले असतात.

(इ) स्थानिक शासन संस्थांच्या कारभाराचे ............ प्रसार माध्यमांच्या आधारे करता येते.

(ई) महिला अल्पबचत गटांमुळे ............ आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्यास मदत होते.

**२. प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) लोकांच्या सहभागातून कोणती गोष्ट घडवून आणणे शक्य असते?

(आ) प्रसार माध्यमांचे कोणते महत्त्व असते?

**३. दोन ते तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) आपण समृद्ध सामाजिक जीवन का जगू शकतो?

(आ) स्वयंसेवी संघटना म्हणजे काय?

**४. तीन ते चार वाक्यांत माहिती लिहा.**

(अ) स्थानिक कारभारात लोकांची जागरूकता

(आ) माहितीचा अधिकार

**उपक्रम**

तुमच्या भागातील स्वयंसेवी संघटनांची माहिती मिळवा.

## परिशिष्ट : स्पष्टीकरणासाठी टिपा

**गुप्त मतदान पद्धत** : मतदाराने कोणाला मत दिले, हे गुप्त ठेवले जाते. त्याकरिता मतपत्रिकेवर मतदाराचे नाव किंवा स्वाक्षरी नसते. मतदार मत नोंदवत असताना तेथे कोणीही व्यक्ती उपस्थित राहू शकत नाही. आवश्यकतेनुसार इलेक्ट्रॉनिक्स यंत्रांच्या साहाय्याने मतदान घेतले जाते.

**नगरपरिषदेचे वर्गीकरण** : लोकसंख्येच्या आधारे नगरपरिषदेचे वर्गीकरण केले जाते. ज्या शहराची लोकसंख्या एक लाखापेक्षा जास्त आहे तेथे 'अ' वर्ग, ज्या शहराची लोकसंख्या ४० हजारांपेक्षा जास्त आणि एक लाखापेक्षा कमी आहे तेथे 'ब' वर्ग आणि ज्या शहराची लोकसंख्या ४० हजारांपेक्षा कमी व २५ हजारांपेक्षा जास्त असते तेथे 'क' वर्ग नगरपरिषद असते.


**नागरिकांचा मागासवर्ग** : राज्यशासन वेळोवेळी ज्या वर्गांना इतर मागासवर्ग, विमुक्त जाती आणि भटक्या जमाती म्हणून घोषित करते, त्यांचा अंतर्भाव नागरिकांचा मागासवर्ग या प्रकारात होतो.


**नागरिकांची सनद** : नागरिकांची सनद शासनाच्या विविध विभागांकडून तयार केली जाते. ज्या विभागांशी जनतेचा जास्त संपर्क असतो,

अशा विभागांनी नागरिकांना कामकाजाची माहिती दिली पाहिजे. त्यांच्या तक्रारींची दखल घेतली पाहिजे. शासनाच्या कार्यालयातील विलंब, दिरंगाई टाळण्यासाठी व नागरिकांना उत्तम सेवा देण्याच्या हेतूने नागरिकांची सनद निर्माण करण्यात येते. सरकारचे लोकांप्रती उत्तरदायित्व दर्शवणारी सनद म्हणून या दस्तऐवजाचे महत्त्व आहे.

**प्रौढ मताधिकार** : आपल्या देशात १८ वर्षे पूर्ण केलेल्या सर्व स्त्री-पुरुष नागरिकांना मतदानाचा अधिकार आहे. शिक्षण, जात, धर्म असा भेदभाव न करता, सर्व प्रौढ नागरिकांना मताधिकार असावा, हे तत्त्व आपल्या देशात मान्य झाले आहे.

**माहितीचा अधिकार** : लोकशाहीत नागरिकांना शासनाच्या कार्यपद्धतीची माहिती असली पाहिजे. शासन सार्वजनिक हितासाठी काय करते, याविषयी माहिती मिळवण्याचा हक्क नागरिकांना असला पाहिजे, या हेतूने 'माहितीचा अधिकार अधिनियम-२००५' लागू करण्यात आला आहे. शासनाकडून आवश्यक ती कागदपत्रे प्राप्त करण्याचा, आपल्या अर्जाची सद्य:स्थिती पाहण्याचा अधिकार नागरिकांना या अधिनियमामुळे प्राप्त झाला आहे.





बृहन्मुंबई महानगरपालिका

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

रु. ६.००